महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे

Rs.2/-

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

रविवार ❖ ४ मे २०२५ ❖ वर्ष ६ ❖ अंक ३०५ ❖ पाने - ४

RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

# जलजीवन योजना गावात पाण्याचा पत्ताच नाही



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर : केंद्र शासनाच्या नवीन योजनांमधील एक असलेली व घराघरात नळाद्वारे पाणी पोचविण्याचे उद्दिष्ट असलेल्या जल जीवन मिशन योजनेअंतर्गत ठाणे जिल्हा परिषदेच्या पाणी पुरवठा विभागामार्फत शहापूर पंचायत समितीच्या पाणी पुरवठा विभागातील अधिकारी व कर्मचारी यांनी विविध नळ पाणी योजनांचे बळकटीकरण व नव्या योजनाच्या मंजुरीचे सोपस्कार करुन २०२४ पर्यंत घराघरात पाणी पोहचवण्याचा केंद्र सरकारचा प्रयत्न होता. पर्यायाने तालुक्यातील पाणी टंचाईला तिलांजली मिळेल असे दिलासादायक चित्र दिसत होते. मात्र २०२५ सरत चालले तरी पाण्याचा टिपूस येत नसल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्न चिन्ह उपस्थित केला जात आहे.

शहापूर तालुक्यातील चिल्हार ग्रुप ग्रामपंचायत हद्दीत अंदाजे २ हजार २५० लोकसंख्या असून यामध्ये जांभूलवाड मध्ये ३०० तर कातकरी वाडीत ४५० अशी लोकसंख्या आहे. या ग्रामपंचायतमध्ये जलजीवन पाणी योजनेचे गावात पाईप टाकून घरासमोर नळ बसवलेले आहेत. मात्र टाकीचा पत्ता नसल्याने गावाला पाणी टंचाईचा सामना करावा लागत असल्याचे पार्वती धोबी या महिला भानिनीने सांगितले. तसाच प्रकार १ हजार ४५० लोकसंख्या असलेल्या कलभोंडे- लादेवादी ग्रामपंचायत हद्दीत आहे.याठिकाणी देखील टाकीचे काम झाले आहे. मात्र पाण्याचा पत्ताच नाही नसल्याने कामधंदा सोडून पाण्याची व्यवस्था करण्यातच दिवस जात असल्याचे येथील ग्रामपंचायत सदस्य शिवाजी वीर यांनी दैनिक पुढारीशी बोलतांना सांगितले.

शहापूर तालुक्यात पाण्याचे स्रोत मोठ्या प्रमाणात असुन तानसा,भातसा,वैतरणा व मोडकसागर सारख्या धरणातून १०० किमी अंतरावर असलेल्या मुंबई,ठाणे महानगरांना वर्षानुवर्ष सुरळीत पाणी पुरवठा



> केंद्र सरकारच्या जल जीवन मिशन योजनेअंतर्गत तालुक्यात पाणी योजनांचे काम प्रामाणिकपणे केले असते तर निश्चितच दरवर्षी भेडसावणाऱ्या पाणी टंचाईपासून शहापूरच्या जनतेची सुटका झाली असती. आमच्या ग्रामपंचायत हद्दीत फक्त गावात पाईप टाकलेत आणि अर्ध्या गावात नळ कनेक्शन जोडले. मात्र अजून पाण्याचा पत्ता नाही.
> **- जना भगत, सरपंच ग्रुप ग्राम पंचायत, चिल्हार - जांभूलवाड.**

सुरू असताना मात्र वर्षातील पाच महिने तालुक्यातील ग्रामीण भागाला टँकरवर अवलंबून राहावे लागत आहे.केंद्र शासनाने नव्याने आणलेल्या जलजीवन मिशन योजने अंतर्गत गाव पातळीवर पाणी कमिटी स्थापन करून नवीन व जुन्या पाणी योजनांना मोठा निधी उपलब्ध करून दिला.यामध्ये जुन्या १७७ नळ पाणी योजनांचे बळकटीकरण

> आमच्या गावात टाकी झाली, गावात पाईप टाकले आणि नळ देखील बसवले. पाणीच येत नसल्याने लोकं संतापाने नळ तोडून टाकत आहेत.
> **- सोमनाथ वाख, सरपंच, ग्रामपंचायत कलभोंडे-लादेवाडी.**


करुन जुन्या योजनांचे पाण्याच्या स्रोतांचे देखील खोलीकरण व बळकटीकरण करायचे होते. शहापूर तालुक्यातील अजनुप, अंबर्जे, आपटे, अस्रोली, आटगांव, आवळे, आवरे, बिरवाडी, बोरशेती, ढाढरे , दळखन, धामणी, जरंडी , धसई, खर्डी ,कानवे सहित १७७ गावांच्या जुन्या नळपाणी योजनांचे दुरुस्ती व बळकटीकरण करण्यात येणार होते.दरम्यान तालुक्यातील अतिदुर्गम भाग असलेल्या दापुर, बाभले, कांबे, गुंडे, दांड, कसारा, उंब्रवणे, खराडे , तुते, कोलकेवाडी , पोकल्याची वाडी , सुसरवाडी, घाणेपाडा, वरस्कोल, राड्याचापाडा, बेंडेकोन व दहिगांव सारख्या ८६ गावांना जलजीवन मिशन अंतर्गत नवीन पाणी योजना करण्याचा प्रस्ताव तयार करण्यात आला. यातील अल्याणी, पष्टेपाडा, विठोबाचे गांव , बेडीसगाव,खोर,वांद्रे या गावांच्या पाणी योजना देखील होत्या .दरम्यान शासनाच्या करोडो रुपयांची उलाढाल झाली असताना या पाणी योजना आजपर्यंत नागरिकांना पाणी देऊ शकत नसल्याने यामध्ये मोठ्या प्रमाणात आर्थिक घोळ झाल्याचा आरोप होत आहे.

### यांना भावली शिवाय पर्याय नाही

तालुक्यातील दांड,उमरावणे, कोथळा,कळभोंडे,फुगाला व ढाकणे यांसारख्या इतर गावांमध्ये पाणी पुरवठा योजनेसाठी पाण्याचे स्रोत उपलब्ध नसल्याचे अधिकृत अहवाल आहे. त्यामुळे या गावांना भावली पाणी पुरवठा योजनेशिवाय पर्याय राहणार नसल्याचे निष्कर्षांअंती समोर आले.

# भुयारी गटार योजनेच्या ठेकेदाराला द्यावे लागणार वीस कोटी रुपये ?

**हलगर्जीपणा करणाऱ्या अधिकाऱ्यांकडून वसुली व्हावी - माजी नगरसेवक संभाजी शिंदे यांची मागणी**



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

बदलापूर : कुळगांव बदलापूर नगरपरिषदेच्या भूमिगत गटार योजनेचे दुष्टचक्र सुटत नसल्याची बाब समोर आली आहे. २०० कोटी रुपयांच्या भूमिगत गटार योजनेत स्कायवे इन्फ्रास्ट्रक्चर या ठेकेदाराने ३५० कोटी रुपयांची रक्कम पालिकेकडून घेऊनही व पालिकेकडून सुरक्षा अनामत रक्कम घेऊनही संबंधित ठेकेदाराने पालिकेवर ४० कोटी रुपयांचा अतिरिक्त रक्कमेची मागणी केली होती. याबाबत संबंधित ठेकेदाराने उच्च न्यायालयात दावा दाखल केल्यानंतर पालिका अधिकारी आणि पालिका अधिवक्ता योग्य भूमिका मांडू न शकल्यामुळे उच्च न्यायालयाने नेमलेल्या लवादाचे माजी न्यायाधीश राजेश केतकर यांनी पालिकेने संबंधित ठेकेदाराला १९.९३ कोटी रक्कम तातडीने देण्याचे आदेश ४ मे २०२४ रोजी दिले होते व ही रक्कम देई पर्यंत द.सा.दशे ८% व्याजाने चक्रवाढ व्याजासकट ही रक्कम देण्याचे आदेश देण्यात आले होते.याबाबत पालिकेने या आदेशाच्या विरोधात कल्याण सत्र न्यायालयात दावा दाखल केला असता (याचिका क्र.९३/२०२४) कल्याण सत्र न्यायालयाने पालिकेचा दावा फेटाळला असून २२ जानेवारी २०२५ च्या आदेशान्वये SECTION 42 OF ARBITRATION AND COUNCILLATION ACT 1996 अन्वये याबाबत उच्च न्यायालयात दाद मागण्याचे आदेश पारित केले आहेत. याबाबत दि. ४ मे २०२४ पासून पालिकेला १९.९३ कोटी रक्कमेवर द.सा. दशे ८% इतक्या दराने व्याज भुर्दंड पडत असून पालिका उच्च न्यायालयात याबाबत लढा लढण्यास व त्यानंतर सुप्रीम कोर्टात दाद मागितल्यास लागणाऱ्या कालावधीत पालिकेवर पुन्हा करोडो रुपयांचा व्याजाचा भुर्दंड पडणार आहे. २० कोटी रुपयांची मुद्दल रक्कम व त्यावर करोडो रुपयांचे व्याज आणि वकिलाचा खर्च वेगळा यासह पालिका तिजोरीची करोडो रुपयांचा चुराडा होणार असल्याचे भारतीय जनता पक्षाचे ठाणे जिल्हा महामंत्री आणि कुळगांव बदलापूर नगर परिषदेचे माजी नगरसेवक संभाजी शिंदे यांनी निदर्शनास आणून दिले आहे.

# कल्याण तालुक्यातील रेशनींग दुकानदारांचे प्रश्न मार्गी लावणार- किसन कथोरे



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण तालुक्यातील रेशनींग दुकानदार चांगली सेवा देत आहेत. त्यांच्या बाबत तक्रारी येत नाहीत. या रेशनींग देकानदारांचे काही प्रश्न अडचणी आहेत ते सोडवणार असल्याची ग्वाही आमदार किसन कथोरे यांनी दिली कल्याण तालुका रेशनींग दुकानदारांची सभा तहसील कार्यालयात सपन्न झाली, यावेळी यावेळी बोलताना आमदार किसन कथोरे बोलत होते. रेशनिंग दुकानदार संघटनेचे तालुका अध्यक्ष वसंत लोणे यांनी याप्रसंगी दुकानदारांचे प्रश्न व अडचणी सांगितल्या त्या ऐकून घेतल्या नंतर श्री कथोरे यांनी या दुकानदारांना तुमच्या सोबत असल्याचे सांगून कल्याण येथे गोडाऊन उभारणी करणे, रेशनिंग दुकानदारांचे कमिशन वाढ करणे याबाबत त्वरित प्रयत्न करणार असल्याचे सांगितले, यावेळी तहसीलदार सचिन शेजल यांनी प्रास्ताविक करत तालुका दक्षता समिती ची माहिती दिली, प्रांत अधिकारी विश्वास गुजर या प्रसंगी उपस्थित होते. तसेच नायब तसीलदात श्री चव्हाण साहेब, पुरवठा अधिकारी मॅडम उपस्थित होत्या. यावेळी महिला बचत गट रेशनींग दुकानदारांनी आपले म्हणणे मांडत कमिशन वेळेवर देण्याची मागणी केली.

# जातनिहाय जनगणनेच्या निर्णयाचे शहापुरात स्वागत

### ओबीसी महासंघाने मानले केंद्र सरकारचे आभार

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर : देशात जातीनिहाय जनगणना करण्याच्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या निर्णयाचे शहापूर तालुक्यात राष्ट्रीय ओबीसी महासंघाने स्वागत केले.या ऐतिहासिक निर्णयामुळे समाजाच्या विविध घटकांच्या विकासासाठी सखोल धोरण ठरविण्यास मदत होणार असून सामाजिक न्यायाचा नवा अध्याय सुरु होईल,असा विश्वास ओबीसी महासंघाचे प्रदेश अध्यक्ष डॉ. प्रकाश भांगरथ यांनी यावेळी व्यक्त केला. तसेच २०११ ला केलेला सामाजिक संरक्षण सर्वेक्षणाची आकडेवारी आजपर्यंत सरकारने जाहीर केली नाही.त्याचबरोबर २०१९ च्या निवडणुकीमध्ये स्वतः गृहमंत्री राजनाथ सिंग यांनी जनगणना करणार अशी घोषणा करूनही त्याची पूर्तता केली नव्हती. त्यामुळे ही घोषणा सुद्धा फुसकाबार ठरु नये अशी शंका ओबीसी संघटनामध्ये निर्माण होत असल्याचे डॉ.प्रकाश भांगरथ यांनी प्रस्तुत प्रतिनिधीशी बोलतांना सांगितले.

ओबीसिंच्या जातनिहाय जनगणेसाठी लढा देत असताना शहापूर तालुक्यातील ओबीसी बांधवांनी अनेकवेळा मुबंई आझाद मैदानात मोर्चा, त्याचप्रमाणे शहापूर तालुका बंदची हाक देत पूर्ण तालुका बंद करुन शहापूर मधील ओबीसी समाज एका छत्राखाली एकवटला,राज्यात गाजलेले भरत निचिते यांचे उपोषण,संत तुकाराम महाराज चौक ते छत्रपती शिवाजी महाराज स्मारक येथे वेळोवेळी जनजागृती फेऱ्या, डॉ.अपर्णा खाडे या ओबीसी महिला भगिनीने बहुचर्चित झालेले मुंडन आंदोलन करुन शासनाकडे न्याय मागितला.तसेच तिरुपती, दिल्ली,पंजाब येथील आधिवेशनात उपस्थिती दर्शवून ओबीसी चळवळ बळकट करण्याचा यशस्वी प्रयत्न केला.शहापूर येथील शिवतीर्थावर झालेल्या कार्यक्रमावेळी ओबीसी महासंघाचे प्रदेश अध्यक्ष डॉ. प्रकाश भांगरथ,किशोर कुडव, मधुकर शिंदे,वसंत भेरे, काशिनाथ तिवरे, बाळासाहेब खारीक, अरुण कासार, सुभाष विशे, किसन भेरे, तालुकाध्यक्ष अनिल निचिते, शेखर अधिकारी, दिलीप भोपतराव, कल्पेश दुधाळे आदि ओबीसी बांधव उपस्थित होते.

# जागतिक अर्थव्यवस्था मजबुतीसाठी पतसंस्थांचे योगदान ही काळाची गरज

**- खासदार डॉ.हेमंत सवरा**



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता / भिवंडी : पालघर जिल्ह्यामध्ये सहकार क्षेत्राचा विकास अत्यंत कमी प्रमाणात असल्याचे दिसत आहे.या जिल्ह्यांमध्ये अर्थव्यवस्था सुदृढ करण्यासाठी, जिल्ह्याचा विकास साध्य करण्यासाठी उद्योगधंदे,रोजगारासह जिल्ह्याचीच नव्हे,तर जागतिक अर्थव्यवस्था सुदृढ व मजबूत करण्यासाठी बँकांसह अशा पतसंस्थांचे योगदान ही काळाची गरज असल्याचे उद्घाटक पालघरचे खासदार डॉ. हेमंत सावरा यांनी वाडा नागरी सहकारी पतसंस्था लिमिटेड च्या कुडूस येथील पहिल्या शाखेचे उद्घाटन करताना कार्यक्रमांमध्ये उद्गार काढले. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून अशोक दुगाडे (सॅटर्डे क्लब, ग्लोबल ट्रस्ट मॅनेजिंग ट्रस्टी) शिरीष कुलकर्णी (उपनिबंधक सहकारी संस्था, पालघर) सुभाषराव खासनीस (सहकार भारती कार्यकर्ता),विष्णुपंत बोबडे (सहकार भारती वरिष्ठ कार्यकर्ता),राजेंद्र कोंगली सरपंच,ग्रामपंचायत कुडूस) हे प्रमुख पाहुणे व निमंत्रित म्हणून उपस्थित होते.

अमृतेश्वर कॉम्प्लेक्स,कुडूस येथील कार्यक्रमात खासदार डॉ. सवरा पुढे म्हणाले की, जागतिक अर्थव्यवस्थेमध्ये तिसऱ्या क्रमांकासाठी पालघर जिल्ह्यातील स्मॉल स्केल इंडस्ट्रीज यांना अर्थ पुरवठा करून अर्थव्यवस्थेला व रोजगाराला अशा यशस्वी संस्था नक्कीच हातभार लावून चालना देतील आणि ग्रामीण भागाचा आर्थिक कणा मजबूत करतील, असा मला ठाम विश्वास वाटतो. या संस्थेची यशस्वी वाटचाल पाहता, लवकरच या संस्थेचे को-ऑपरेटिव्ह बँकेमध्ये रूपांतर होईल अशा शुभेच्छा त्यांनी यावेळी व्यक्त केल्या.

याप्रसंगी शिरीष कुलकर्णी (उपनिबंधक सहकारी संस्था,पालघर ) यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, कोणतीही आर्थिक पतसंस्था निर्मिती करणे, त्या टिकवणे आणि वाढवणं हे अत्यंत कठीण असते. अनेक प्रकारच्या प्रश्नांना सामोरे जाऊन तारेवरचे कसरत करावी लागते. ही कसरत करताना कर्ज देणं, त्याची नियमितपणे वसुली करणे, सुरक्षित ठेवी,गुंतवणुका,त्यातून चांगला नफा मिळवून मिळवला तर अशा संस्था समृद्ध होतात.त्यांनी पुढे असे म्हटले आहे की, वाडा नागरी सहकारी पतसंस्थेची बॅलन्सशीट अत्यंत सक्षम असल्याने या पहिल्या शाखेचे उद्घाटन होणे हे अत्यंत प्रगतीचे लक्षण आहे.कोणत्याही कर्ज देणे वसुलीमध्ये संचालकांचे बिलकुल हस्तक्षेप नाही.संचालक, व्यवस्थापन अधिकारी व कर्मचाऱ्यांचे उत्तम समन्वय हे या संस्थेच्या बळकटीचे आणि प्रगतीपथाचे आदर्शवत असे उदाहरण येथे पाहायला मिळते. सर्वांना डिव्हीडंट चे परतावे ही केल्याने येथे प्रशासकीय व आर्थिक शिस्तीचे पालन केले जात असल्याचे दिसते. आणि यातूनच शाखा निर्मिती करण्यासाठी सहकार विभागाने परवानगी दिली आहे ही संस्थेसाठी अत्यंत आनंदाची गोष्ट आहे. यासह ही पतसंस्था सामाजिक बांधिलकी जपून येथील लोकांना विविध सुविधा पुरवणे ही बाब अभिनंदनीय अशीच आहे. कार्यक्रमांमध्ये प्रमुख पाहुणे म्हणून अशोक दुगाडे (सॅटर्डे क्लब ग्लोबल ट्रस्ट, मॅनेजिंग ट्रस्टी) यांनी आपल्या भाषणात सांगितले की, उत्तम आर्थिक नियोजन, संस्थेचे विस्तारीकरण करण्यासाठी संचालकांनी अत्यंत मेहनत आणि सचोटीने काम केल्यानेच ही संस्था पहिल्या शाखेचे उद्घाटन या ठिकाणी यशस्वीपणे संपन्न होत आहे.ही संस्थेतील सर्वांसाठी आनंददायी अशीच बाब आहे.

विशेष निमंत्रित म्हणून उपस्थित असलेले सुभाषराव खासनीस (सहकार भारती कार्यकर्ते) यांनी यावेळी म्हटले की, या संस्थेची कोटीच्या कोटी उड्डाणे पाहता, म्हणजे शंभर कोटीचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी माजी अध्यक्ष मिलन पातकर व त्यांच्या सहकाऱ्यांचे टीमवर्क व विशेष मेहनत दिसते. त्यामुळे ही संस्थेची घोडदौड सदैव अशीच यशस्वीपणे सुरू राहील यात शंका वाटत नाही.

महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून, वाडा नागरी सहकारी पतसंस्थेच्या या पहिल्या शाखेच्या उद्घाटन प्रसंगी प्रास्ताविक पतसंस्थेचे माजी अध्यक्ष मिलन पातकर व सूत्रसंचालन वैभव ठाकरे व सुजीत देशमुख यांनी संयुक्तरीत्या केले. यावेळी संस्थेचे सभासद,ठेवीदार, उद्योजक, कुडूसचे व्यापारी व संस्थेचे सर्व संचालक उपस्थित होते.

# आता चौथ्या मुंबईचा प्रस्ताव

चौथ्या मुंबई बाबत बोलायचं झालं तर या प्रकल्पात एकूण 107 गावांचा समावेश करण्यात आला आहे. या संबंधित गावांमधील 512 चौ. किमी परिसराचा चौथ्या मुंबई समावेश करण्यात आला आहे. या प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात वंधवन, आंबीस्तेवाडी, वसगाव, ताडियाले यासह 11 गावांमध्ये 33.88 चौ. किमी क्षेत्रावर विकास केंद्र उभारले जाणार अशी सुद्धा माहिती संबंधित अधिकाऱ्यांकडून हाती आली आहे. येथे लॉजिस्टिक पार्क, कंटेनर डेपो, पंचतारांकित हॉटेल्स, कन्व्हेन्शन सेंटर्स आणि एअरस्ट्रिप अशा गोष्टी विकसित केल्या जाणार आहेत. वर्सोवा-विरार-पालघर सी-लिंक प्रकल्पामुळे चौथ्या मुंबईची दळणवळण व्यवस्था फारच सुलभहोणार आहे. या सी लिंक मुळे नरिमन पॉईंटपासून पालघरचा प्रवास केवळ एका तासात शक्य होईल असा दावा सुद्धा करण्यात आला आहे. म्हणजेच चौथी मुंबईतून मुंबईत येणे फारच सोयीचे राहणार आहे. चौथी मुंबई हा महाराष्ट्राच्या औद्योगिक, वाहतूक आणि नागरी विकासाला नवा आयाम देणारा प्रकल्प ठरणार असा विश्वास जाणकार लोकांकडून सुद्धा वर्तवण्यात आला आहे.




# भिवंडीत एका महिलेसह तीन बांगलादेशींची धरपकड

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : पहलगाम येथील पर्यटकांवर झालेल्या अतिरेकी हल्ल्यानंतर पाकिस्तानी नागरिकांना देशाबाहेर हुसकावून लावण्याची मोहीम सुरू झालेली असतानाच देशात अनधिकृतपणे राहणाऱ्या बांगलादेशी नागरिकांचा सुद्धा पोलिसांनी शोध सुरू केला आहे.भिवंडी पोलीस उपायुक्त परिमंडळ क्षेत्रात सोमवारपासून आठ बांगलादेशी नागरिकांना अटक केल्यानंतर गुरुवारी कोनगाव व नारपोली पोलीस ठाण्याच्या हद्दीत तिघा बांगलादेशी नागरिकांची धरपकड केल्याने ही संख्या दहावर पोहोचली आहे.यामध्ये एका महिलेचा समावेश आहे.कोनगाव पोलिस ठाणे हद्दीत सरवली एम.आय.डी.सी. येथे रौनक डाईंग येथे काम करीत असलेल्या संशयित याकुब मजहर मीया शेख वय ५२ या ताब्यात घेऊन चौकशी केली असता, त्याने बांगलादेश येथून लपतछपत भारतीय सरहद्दीमध्ये प्रवेश केला होता.भिवंडी शहर पोलिस ठाणे हद्दीत रुंगठा डाईंग मागे भाड्याच्या खोलीत राहत असल्याचे तपासात निष्पन्न झाल्याने कोनगाव पोलिसांनी त्या विरोधात गुन्हा दाखल करीत अटक केली आहे.तर दुसऱ्या घटनेत राहनाळ बस स्टॉप येथील दीपेश हॉटेल समोर दोघे संशयित मोहम्मद शामुल मोहम्मद शफी खान याने भारतात घुसखोरी करून प्रवेश केल्यानंतर स्वतःचे नाव मोहम्मद हसन रेहमान मिया शेख असे सांगून काल्हेर येथील रिद्धी सिद्धी मेन्शन या इमारती मध्ये राहत असल्याचे आढळून आले.तर प्यारू शाफिक शेख वय ३६ ही महिला भिवंडी शहरात वास्तव्यास असल्याचे आढळून आले.या दोघां विरोधात नारपोली पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदवून दोघा पुरुष घुसखोरांना अटक केली आहे.

# गीतासार



## अध्याय १०
## विभूतियोगः

तेषामेवानुकम्पार्थमहमज्ञानजं तमः । नाशयाम्यात्मभावस्थो ज्ञानदीपेन भास्वता ॥ १०-११ ॥

त्यांच्यावर कृपा करण्यासाठी त्यांच्या अंतःकरणात असलेला मी स्वतःच त्यांच्या अज्ञानाने उत्पन्न झालेला अंधकार प्रकाशमय तत्त्वज्ञानरूप दिव्याने नाहीसा करतो. ॥ १०-११ ॥

अर्जुन उवाच परं ब्रह्म परं धाम पवित्रं परमं भवान् । पुरुषं शाश्वतं दिव्यमादिदेवमजं विभुम् ॥ १०-१२ ॥

आहुस्त्वामृषयः सर्वे देवर्षिर्नारदस्तथा । असितो देवलो व्यासः स्वयं चैव ब्रवीषि मे ॥ १०-१३ ॥

अर्जुन म्हणाला, आपण परम ब्रह्म, परम धाम, आणि परम पवित्र आहात. कारण आपल्याला सर्व ऋषिगण सनातन, दिव्य पुरुष, तसेच देवांचाही आदिदेव, अजन्मा आणि सर्वव्यापी म्हणतात. देवर्षी नारद, असित, देवल व महर्षी व्यासही तसेच सांगतात आणि आपणही मला तसेच सांगता. ॥ १०-१२, १०-१३ ॥

सर्वमेतदृतं मन्ये यन्मां वदसि केशव । न हि ते भगवन्व्यक्तिं विदुर्देवा न दानवाः ॥ १०-१४ ॥

हे केशवा (अर्थात श्रीकृष्णा), जे काही मला आपण सांगत आहात, ते सर्व मी सत्य मानतो. हे भगवन् आपल्या लीलामय स्वरूपाला ना दानव जाणतात ना देव. ॥ १०-१४ ॥

स्वयमेवात्मनात्मानं वेत्थ त्वं पुरुषोत्तम । भूतभावन भूतेष देवदेव जगत्पते ॥ १०-१५ ॥

हे भूतांना उत्पन्न करणारे, हे भूतांचे ईश्वर, हे देवांचे देव, हे जगाचे स्वामी, हे पुरुषोत्तमा, तुम्ही स्वतःच आपण आपल्याला जाणत आहात. ॥ १०-१५ ॥

# रेसिपी
## पंजाबी आलू कुलचा



साहित्य - उकडलेले बटाटे - सहा, तिखट -अर्धा टीस्पून, हिरव्या मिरच्या - दोन, चाट मसाला - एक टीस्पून, कोथिंबीर, मीठ - चवीनुसार, कुलचा पीठ - दोन कप, दही - अर्धा कप, बेकिंग सोडा - अर्धा टीस्पून, पिठीसाखर - दोन टीस्पून, सुके पीठ, मीठ चवीनुसार

कृती - उकडलेले बटाटे सोलून एका भांड्यात मॅश करा. आता मॅश केलेल्या बटाट्यांमध्ये लाल तिखट, गरम मसाला, चाट मसाला, चिरलेली हिरवी मिरची, कोथिंबीर आणि मीठ घाला आणि चांगले मिसळा. त्यात मैदा घाला. आता मैद्यात साखर, बेकिंग सोडा, दही आणि चवीनुसार मीठ घालून मिक्स करा. आता थोडे थोडे पाणी घाला व मळून घ्या. पीठ मळल्यानंतर साधारण २० मिनिटे बाजूला ठेवा. आता मोठे गोळे तयार करा. एक मोठा गोळा घ्या आणि तो हलका दाबा. आता त्यावर कोरडे पीठ लावा आणि थोडे जाडसर लाटून घ्या. आता त्यात एक चमचा बटाट्याचे मिश्रण टाका आणि ते सर्व बाजूंनी पॅक करा आणि पिठाचा गोळा बनवा.आता पिठाच्या एका बाजूला कोथिंबीरची पाने ठेवा आणि दाबा. हवा तो आकार द्या. आता मध्यम आचेवर कुलचा एका बाजूने चांगला शिजला की, गॅसच्या आचेवर पॅन उलटा करा.असे केल्याने कोथिंबीरच्या बाजूचा कुलचाही चांगला शिजेल.

# वैभव सूर्यवंशी : भारतीय क्रिकेटचे भविष्य



आयपीएल म्हणजे रत्नांची खाण असे म्हंटले जाते कारण दरवर्षी आयपीएल मध्ये असे काही नवीन रत्न उदयास येते की ज्या रत्नांनी संपूर्ण क्रिकेट विश्वच उजळून निघते. अशाच एका उगवत्या रत्नाने केवळ भारतीय क्रिकेटच नव्हे तर संपूर्ण क्रिकेट विश्वच उजुळून निघाले आहे आणि हे रत्न आहे अवघ्या १४ वर्षाचं आणि त्याचं नाव आहे वैभव सूर्यवंशी. सध्या आयपीएलमध्ये वैभव सूर्यवंशी या १४ वर्षाच्या मुलाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे अर्थात त्याने तसा कारनामा ही करून दाखवला आहे. मूळचा बिहार राज्यातील असलेला वैभव सूर्यवंशी हा अवघा १४ वर्षाचा युवा खेळाडू आहे. राजस्थान रॉयल्स या संघाने ज्यावेळी त्याच्यावर १ कोटी १० लाखांची बोली लावून त्याला आपल्या संघात घेतले त्याच वेळी त्याची चर्चा सुरू झाली. राजस्थान रॉयल्स संघाने या १४ वर्षाच्या मुलावर इतका मोठा दाव का लावला असा प्रश्न विचारला गेला त्याचे उत्तर शोधण्यासाठी थोडं मागे जावे लागेल. वैभव सुर्यवंशीने १२ व्या वर्षीच बिहार कडून १९ वर्षाखालील संघातून विनू मंकड चषक स्पर्धेत भाग घेतला. तिथे त्याने चांगली कामगिरी केल्याने त्याची निवड बिहारच्या रणजी संघात करण्यात आली. बिहारकडून रणजी स्पर्धेत खेळणारा सर्वात कमी वयाचा तो खेळाडू ठरला. १३ व्या वर्षी वैभवने विजय हजारे चषकात धावांचा रतीब घातला त्यामुळे त्याची भारताच्या १९ वर्षाखालील ब संघात निवड झाली. चार संघात झालेल्या स्पर्धेत त्याने ६ डावात १७७ धावा काढल्या त्यात त्याने दोन अर्धशतके झळकावली त्यामुळे ऑस्ट्रेलिया विरुद्ध भारताच्या १९ वर्षाखालील मुख्य संघात त्याची निवड झाली. १९ वर्षाखालील कसोटीतील पदार्पणाच्या सामन्यात त्याने अवघ्या ५८ चेंडूत शतक झळकावले त्यावेळी त्याचे वय १३ वर्ष होते. त्यानंतर १९ वर्षाखालील आशिया कप स्पर्धेत तर त्याने धुमाकूळ घातला. तिथे युएई विरुद्ध त्याने ४६ चेंडूत ७६ धावा काढल्या तर उपांत्य फेरीत श्रीलंके विरुद्ध ३६ चेंडूत ६७ धावा काढल्या. या स्पर्धेपासून त्याची सर्वत्र चर्चा होऊ लागली. ही चर्चा राजस्थान रॉयल्स संघाच्या पदाधिकाऱ्यांना समजली. त्यांनी त्यांचा बॅटिंग कोच असलेल्या विक्रम राठोडला वैभव सूर्यवंशीची फलंदाजी पाहण्यास सांगितली. विक्रम राठोड यांनी वैभवला खेळताना पाहिले आणि त्याला आपल्या संघात घेण्याचे निश्चित केले. त्यांचा मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविड हा तर नवोदित खेळाडूंना संधी देण्यास प्रसिद्ध आहे. त्याने देखील वैभवची फलंदाजी पाहिली आणि त्याला संधी देण्याचे ठरवले आणि अशा प्रकारे त्याची राजस्थान संघात एन्ट्री झाली. आयपीएल सुरू झाली पण सुरुवातीच्या काही सामन्यात वैभवला संधी मिळाली नाही. लखनऊ या संघाविरुद्ध राजस्थान रॉयल्सने त्याला संधी दिली. वैभव या संधीची वाटच पाहत होता. त्याने या संधीचे सोने करायचे ठरवले आणि पहिल्याच चेंडूवर त्याने अनुभवी शार्दुल ठाकूरला पुढे सरसावत षटकार खेचला आणि सर्वांना चकित केले. या सामन्यात त्याने २० चेंडूत ३४ धावा काढून आपल्या आयपीएल कारकिर्दीची धडाकेबाज सुरुवात केली. दुसऱ्या सामन्यातही त्याने चांगली खेळी केली मात्र आपल्या तिसऱ्या सामन्यात तर त्याने कमाल केली. गुजरात टायटन्स विरुद्धच्या या सामन्यात त्याने केवळ ३८ चेंडूत १०१ धावांची धमाकेदार खेळी करत शतक झळकावले. या शतकासोबत त्याने अनेक विक्रमांना गवसणी घातली. तो आयपीएल इतिहासातील सर्वात कमी चेंडूत शतक झळकावणारा खेळाडू ठरला. केवळ आयपीएलच नाही तर टी २० क्रिकेट इतिहासात सर्वात कमी वयाचा शतक झळकावणारा तो खेळाडू ठरला. आयपीएलमध्ये सर्वात कमी चेंडूत शतक झळकावणारा तो भारतीय ठरला. त्याने अवघ्या ३६ चेंडूत शतक झळकावत युसुफ पठाणचा विक्रम मोडला. एका सामन्यात त्याने सर्वाधिक षटकार मारणारा भारतीय खेळाडू ठरण्याचा विक्रमही त्याने आपल्या नावावर केला. या सामन्यात त्याने ११ षटकार खेचले ते ही ईशांत शर्मा, मोहम्मद सिराज, वॉशिंग्टन सुंदर आणि राशिद खान या आंतरराष्ट्रीय खेळाडूंविरुद्ध. त्याच्या या धडाकेबाज खेळीने सर्व आजी माजी खेळाडू आणि क्रिकेटप्रेमींनी त्याच्यावर कौतुकाचा वर्षाव केला. क्रिकेटचा देव म्हणून ओळखला जाणारा सचिन तेंडुलकरने वैभवच्या खेळीवर ट्विट केले की " वैभवची निडर शैली, उत्कृष्ट बॅट स्पीड, चेंडूची लांबी पटकन ओळखण्याची क्षमता आणि चेंडूच्या मागे ताकद लावण्याची तयारी, या सर्वांचा संगम त्याच्या धमाकेदार खेळीमागे होता. ३८ चेंडूत १०१ धावा जबरदस्त कामगिरी. जबरदस्त खेळ....!"

केवळ सचिन तेंडुलकरच नव्हे तर अनेक दिग्गज खेळाडूंनी त्याच्या कौतुकाचे इमले बांधले. केवळ खेळाडूच नव्हे तर क्रिकेट प्रेमींनीही त्याच्यावर कौतुकाचा वर्षाव केला. क्रिकेट प्रेमींनी त्याच्या या खेळीचे व्हिडिओ, फोटो सोशल मीडियावर शेअर करत त्याच्यावर कौतुकाचा वर्षाव केला. मीडिया तर त्याच्यावर फिदाच झाली. त्याच्या या खेळीने त्याने आपण भारताचे भविष्य आहोत हे दाखवून दिले आहे. मुलाचे पाय पाळण्यात दिसतात या म्हणीप्रमाणे त्याने लहान वयातच आपण कोण होणार हे दाखवून दिले आहे. त्याच्या या लाजवाब खेळीने त्याच्यावर अचानक प्रसिद्धीचा झोत आला आहे. वैभवने मात्र या झगमगाटाकडे दुर्लक्ष करून खेळावर लक्ष केंद्रित करायला हवे. त्याला आणखी यशोशिखरे गाठायची असेल तर त्याने झगमगाटापासून दूर राहिलेलेच बरे. प्रसिद्धीच्या झगमगाटात वाहत जाऊन आपल्या करिअरचे मातेरे करणारे अनेक खेळाडू आपण पाहिले आहेत. विनोद कांबळी, पृथ्वी शॉ ही त्याची बोलकी उदाहरणे आहेत. वैभवने आपल्या खेळावर लक्ष केंद्रित करून आणखी मेहनत केल्यास तो भारतीय क्रिकेटचे भविष्य ठरेल यात शंका नाही. वैभवला खूप खूप शुभेच्छा!

- श्याम ठाणेदार,दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

# महापारेषणच्या मनमानी कारभाराविरोधात सर्व पक्षीय आंदोलन

**शेतकऱ्यांना प्रथम मोबदला द्या मग काम करा**
**शेतकरी व आंदोलकांची मागणी**




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण तालुक्याच्या ग्रामीण भागातील खडवली, चिंचवली, उतणे, रुंदे, म्हस्कल, गोवेली, वाहोली, वसत, शेलवली यांसह १३ गावातून महापारेषण कंपनीच्या विद्युत वाहिन्या टाकण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. मात्र हे काम करत असताना कंपनी कडून शेतकऱ्यांना कोणत्याही प्रकारच्या सुचना, नोटीस व मोबदला न देता मनमानी व जबरदस्तीने महापारेषण कडून काम केलं जातं असल्याचा शेतकऱ्यांचा आरोप आहे.

या कामाला शेतकऱ्यांनी विरोध दर्शविला असून, या संदर्भात शेतकऱ्यांना तालुक्यातील सर्व पक्षीय नेत्यानी पाठिंबा दर्शविला असून विविध पक्षांचे नेते व कार्यकर्ते वाहोली येथील शेतकऱ्यांच्या आंदोलनात सहभागी झाले. शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी आम्ही सदैव त्यांच्या पाठीशी उभे राहू, आधी शेतकऱ्यांना त्यांच्या जागेचा मोबदला द्या मगच काम करा अशा प्रकारचा इशारा उध्दव बाळासाहेब ठाकरे शिवसेना गटाचे जिल्हा प्रमुख अल्पेश भोईर यांनी दिला आहे.

यावेळी तालुक्यातील शेकडो बाधीत शेतकरी व विविध पक्षांचे कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी महापारेषण कंपनीच्या अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांच पत्र देण्यात आलं. कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार घडू नये म्हणून कल्याण तालुका पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुरेश कदम, यांनी कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी चोख बंदोबस्त तैनात केला होता.

### अंबरनाथ नगरपरिषदेसमोरील
# रिपाइं उपोषण स्थगित




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

अंबरनाथ : रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाच्या अंबरनाथ शाखेच्या वतीने स्थानिक प्रश्नासाठी अंबरनाथ शाखेचे संपर्क प्रमुख तेजस सरवदे हे तीन दिवसा पासून उपोषणास बसले होते. अंबरनाथ नगर परिषदेने सर्व मागण्या मान्य केल्याचे लेखी उत्तर दिल्यानंतर आज रिपब्लिकन पक्षाच्या वतीने उपोषण मागे घेण्यात आले. अंबरनाथ मध्ये हिंदू स्मशान भूमितील विद्दूत शव दाहिणी बंद असल्यामुळे शव जाळण्यासाठी ३५००/- रुपये घेतले जातात. मेटलनगर हनुमान मंदिर परिसरातील सार्वजनिक शौचालय तोडण्यात आले असून बाजूला एक समाजमंदिर असतांना सौचालयच्या जागेवर दुसरे समाजमंदिर बांधणे प्रस्तावित आहे. या सौचालयाच्या जागेवर पुन्हा सौचालय बांधण्यात यावे, नाला अडवून झालेल्या अनधिकृत बांधकामावर, कारवाई करण्यात यावी या मागणीसाठी रिपब्लिकन पक्षाच्या वतीने आंदोलन करण्यात आले होते.

रिपब्लिकन पक्षाचे जेष्ठ नेते ठाणे प्रदेश अध्यक्ष आण्णासाहेब रोकडे यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने अंबरनाथ नगरपरिषदेचे मुख्याधिकारी उमाकांत गायकवाड यांची भेट घेऊन मागण्या संदर्भात सविस्तर चर्चा केली. शिष्टमंडळात ठाणे ग्रामीण सरचिटणीस बाळासाहेब भालेराव, ठाणे प्रदेश सरचिटणीस श्याम शेवाळे, महाराष्ट्र राज्य सह सचिव राहुल हंडोरे, अंबरनाथ अध्यक्ष दिपक धनावडे, सरचिटणीस दिलिप जाधव, कार्याध्यक्ष बाळासाहेब खंडागळे, चिटणीस सुनील काकडे, उपाध्यक्ष जीवन शिंदे, तसेच कल्याणचे माजी नगरसेवक महादेव रायभोळे, उल्हासनगर महिला प्रतिनिधी आशा सोनवणे आदींचा समावेश होता.

शिष्टमंडळाशी चर्चा करताना मुख्याधिकारी गायकवाड म्हणाले की, स्मशान भूमितील विद्दूत शव दाहीनी सुरु करण्यात आली आहे. सार्वजनिक शॉचालय का पाडले यांची चौकशी केली जाईल. तात्पुरते फिरते सौचालायची व्यवस्था केली जाईल. अनधिकृत बांधकामावर कारवाही केली जाईल असे शिष्टमंडळाला आश्वासन दिले. तसेच लेखी उत्तर दिल्यानंतर उपोषण मागे घेण्यात आले.

या प्रसंगी ठाणे प्रदेशाचे कमालकर सूर्यवंशी, अंबरनाथ विधानसभा अध्यक्ष संतोष उबाळे, उल्हासनगर युवा नेता निलेश ढोके, महिला प्रतिनिधी मीना नगराळे, मीना बाविस्कर, स्मिता महाजन आदी. कार्यकर्त्या उपस्थित होत्या.

# अतिक्रमण विभागामार्फत बेघर झोपड्यांवर कारवाई



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

नवी मुंबई : नवी मुंबई महानगरपालिका विभागामार्फत मा. आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार व अतिरिक्त आयुक्त (2) डॉ. राहुल गेठे व उप आयुक्त (अतिक्रमण) श्री. भागवत डोईफोडे यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागाने बेलापूर विभागात बेघर हटविणेसाठीची कारवाई करण्यात आली.

नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील, नेरुळ सेक्टर-25 मलनिसनण: केंद्र (STP) च्या मागे असलेल्या अनधिकृत झोपडया स्वत:हून हटविने आवश्यक होते.ॱअ विभाग कार्यालय बेलापूर मार्फत तोडक कारवाईचे आयोजन करुन, नेरुळ सेक्टर- 25 मलनिसनण: केंद्र (STP) च्या मागे असलेल्या 25 अनधिकृत झोपडया निष्कासित करण्यात आलेल्या आहेत. तसेच तसेच, L & T ब्रिज खालील सेक्टर-42, सिवूड्स, नवी मुंबई, येथील बेघर हटविण्यात आले.

या धडक मोहिमेसाठी बेलापूर विभागाचे सहाय्यक आयुक्त तथा विभाग अधिकारी डॉ. अमोल पालवे,ॱअ विभाग बेलापूर येथील अधिकारी/कर्मचारी तसेच अतिक्रमण विभागाकडील पोलिस तैनात होते. सदर मोहिमेकरीता जेसीबी - 01, मजुर – 10, आयचर वाहन - 01 यांचा वापर करण्यात आलेला आहे.यापुढे देखील अशा प्रकारे कारवाई तीव्र करण्यात येणार आहे.

# ती बोलण्यात गुंतवायची...
## पर्समधील मोबाईल व पैसे चोरायची

**प्रवासी महिलांना तिचा संशय आला नी पकडले**


दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली : रेल्वे लोकल डब्यात महिलांना बोलण्यात गुंतवून ठेवून गर्दीचा फायदा घेऊन महिलांच्या पर्स व मोबाईल फोन चोरी करणाऱ्या महिलेला प्रवासी महिलांनी रंगेहात पकडून डोंबिवली रेल्वे पोलिसांच्या ताब्यात दिले. ही घटना 30 एप्रिल रोजी डोंबिवली ते कोपर रेल्वे स्थानकादरम्यान घडली. पोलिसांना तिच्याकडे महागडे मोबाईल व पैसे सापडल्याने तिच्यावर गुन्हा दाखल करून अटक केली.

याबाबत पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, वैशाली करण सचदेव असे अटक केलेल्या महिलेचे नाव आहे. वैशाली ही लोकलमध्ये महिला प्रवाशांना बोलण्यात गुंतवत होती. गर्दीचा फायदा घेत महिलांच्या पर्स मधील महागडे मोबाईल व पैसे चोरायची. मात्र 30 तारखेला कोपर ते डोंबिवली रेल्वे स्थानकादरम्यान त्या महिलेने चोरीचा प्रयत्न केला असता तिचा संशय आल्याने महिला प्रवाशांना तिला पकडून डोंबिवली रेल्वे स्थानक आल्यावर रेल्वे पोलिसांचा ताब्यात दिले. अटक केलेल्या महिलेवर याआधी पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल आल्यावची माहिती पोलिसांनी दिली. सदरची कामगिरी वरिष्ठ पोलीस निरीक्षक किरण उंदरे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि जारवाल, पोलीस उपनिरीक्षक सोनार, तायडे, नष्टे, पोहवा पाटील, पोहवा शिखरे, मपोहवा कांबळे, मपोहवा खोत, मपोहवा खांडगे, मपोहवा तोरमल, पोशि भांडारकर यांनी बजावली. यांप्रकरणी पुढील तपास मपोहवा गायकवाड करत आहेत.

# आंब्याच्या पेटीत आढळले घोरपडीचे पिल्लू

**सर्पमित्राने घोरपडीच्या पिल्लाला दिले जीवनदान**



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण पश्चिमेतील वायलेनगर परिसरात आंबे विक्रेत्याच्या आंबाच्या पेटीत साप सदृश्य जीव आढळल्याने भितीने विक्रेत्याची धादंल उडाल्याचा धक्कादायक प्रकार नुकताच घडला.

वायले नगर जवळील निळकंठ पार्क सोसायटीच्या बाजूला एका आंब्या विक्रेत्याच्या पेटीमध्ये साप सुदृश्य जीव आढळल्याने विक्रेताची भितीने धादंल उडाली. या घटने संदर्भात सर्प मित्र दत्ता बोंबे यांना विशाल गायकर याने घोणस साप आहे असं सांगितल्याने तातडीने घटनास्थळी सर्पमित्र दत्ता बोंबे यांनी तिथे जाऊन पाहिलं तर आंब्याच्या पेटीतील आंब्याच्या आडोशाला लपलेल्या घोरपडीच्या पिल्ला सुखरूप बाहेर काढले. आणि उपस्थितीतांनी सुटकेचा निश्वास टाकला. सर्पमित्र दत्ता बोंबे यांनी जीवनदान दिलेल्या घोरपडीच्या पिल्लास नैसर्गिक अधिवासात सोडण्यात आले.

# अखेर पेंढारकर कॉलेजवर प्रशासकाची नियुक्ती
## सेव्ह पेंढारकर कॉलेज मोहिमेला यश




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : अनुदानित असलेले पेंढारकर कॉलेज विनाअनुदानित करण्याचा घाट घातल्याने पेंढारकर कॉलेज वाचवण्यासाठी सेव्ह पेंढारकर कॉलेज मोहिमे अंतर्गत गेल्या 10 महिन्यांपासून कॉलेज समोर शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, कॉलेजचे माजी विद्यार्थी आणि डोंबिवलीकर नागरिक यांचे उपोषण सुरू होते. त्यांच्या या लढ्याला यश आले असून अखेर पेंढारकर कॉलेजवर प्रशासकाची नियुक्ती करण्याचे आदेश प्र. शिक्षण संचालक उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य पुणे डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी काढले आहेत.

शासनाच्या या निर्णयानंतर पेंढारकर कॉलेज बाहेर सेव्ह पेंढारकर मोहिमेचे सोनू सुरवसे आणि त्यांच्या सह कॉलेजचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, माजी विद्यार्थी आणि डोंबिवलीकर नागरिकांनी जल्लोष साजरा केला. यावेळी त्यांनी गुलाल उधळत, फटाके फोडत, बँडच्या तालावर नाचत आपला आनंद व्यक्त केला. पेंढारकर कॉलेज प्रशासनाच्या मनमानी कारभाराविरोधात पेंढारकर कॉलेज बचाव समितीच्या माध्यमातून पेंढारकर कॉलेज डोंबिवली जे मूळ अनुदानित आहे, ते विनानुदानित करण्याचा कॉलेज प्रशासनाचा कट आहे. या विरोधात पेंढारकर कॉलेज बचाव समिती तर्फे गेल्या 10 महिन्यांपासून साखळी उपोषण आंदोलन सुरू होते.

news.thanejeevandeep@gmail.com
दैनिक ठाणे जीवनदीप
WhatsApp Channels
Follow, Unfollow, & Create Them
महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक
दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
मुंबई • नवी मंबई • ठाणे • रायगड • पालघर
मुख्य संपादक : रवींद्र नारायण घोडविंदे
कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम. डी.)
9619188558 / 9082664781
www.jeevandeepvarta.com/
आपलं हक्काचं दैनिक, दररोज वाचा.

जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई, संचलित
जीवनदीप कॉलेज, गोवेली
मुंबई विद्यापीठाशी कायम संलग्न, नॅक मुल्यांकन ("B"Grade) प्राप्त
ADMISSION OPEN 2025-2026
BAMMC MASS MEDIA
M.A. C&J COMMUNICATION & JOURNALISM
Look forward to a BRIGHTER FUTURE
8108559566
9619188558

जीवनदीप शैक्षणिक संस्था, पोई संचलित
जीवनदीप महाविद्यालय, गोवेली
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, गोवेली
मुंबई विद्यापीठाशी कायम संलग्न, नॅक मुल्यांकन (B- Grade) प्राप्त
११ वी व १२ वी
कला, वाणिज्य, विज्ञान (IT / CS)
UNDER GRADUATION: B.Sc Data Science, B.Sc IT, B.Sc Chemistry Maths, BMS, BAF, B.Com, BAMMC, B.A.
POST GRADUATION: M.Sc IT, M.Sc Chemistry, M.Com Advanced Accountancy, MAMMC, M.A. Marathi, M.A. Economics, M.A. History, M.A. Sociology, M.A. Geography
Admission Open 2025-2026
आपलं कॉलेज, हक्काचं कॉलेज
आजच आपला प्रवेश निश्चित करा!
7775851123, 8108559566
9619188558

## आर्थिकदृष्ट्या 'गरजू रुग्णांना आर्थिक सहाय्य' करण्या आहे दक्ष..आपला

# 'मुख्यमंत्री सहाय्यता कक्ष'

राज्यातील आर्थिकदृष्ट्या गरजू रुग्णांना आर्थिक सहाय्य करण्याकरिता राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयात 'मुख्यमंत्री सहाय्यता कक्ष' सुरू करण्यात यावेत, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले होते, त्यानुसार या कक्षाचे आज 1 मे 2025 रोजी महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून पालकमंत्री / मंत्री/ राज्यमंत्री यांच्या हस्ते संपूर्ण राज्यात उद्घाटन करण्यात आले. या कक्षाचे प्रमुख म्हणून रामेश्वर नाईक हे अत्यंत संवेदनशीलतेने जबाबदारी सांभाळीत आहेत.

राज्यातील गरजू रूग्णांना उपचारासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या माध्यमातून आर्थिक मदत पुरवली जाते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार जिल्हास्तरीय मुख्यमंत्री सहाय्यता कक्ष सुरू करण्यासंदर्भात दि.22 फेब्रुवारी 2025 रोजी शासन निर्णय काढण्यात आला. शिवाय, मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रूग्णालय मदत कक्षाची दि.23 एप्रिल रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली होती, या बैठकीत त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना जिल्हास्तरीय मुख्यमंत्री सहाय्यता कक्ष पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करण्याबाबत निर्देश दिले होते.

वैद्यकीय उपचासाठी मदत मिळावी, याकरिता गरजू रूग्ण व त्यांचे नातेवाईक मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाकडे मोठ्या प्रमाणात अर्ज करत असतात. अर्जाचा पाठपुरावा करण्यासाठी ते मंत्रालयात वारंवार येतात. रूग्ण व नातेवाईकांना होणारा त्रास लक्षात घेवून मुख्यमंत्री फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून रूग्ण व नातेवाईकांची परवड थांबविण्याच्या उद्देशातून हा कक्ष स्थापन करण्यात आला आहे.

मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्ष

**काय असणार कक्षाची जबाबदारी:**

- अर्ज करण्यासाठी रूग्ण व नातेवाईकांना मदत करणे.
- प्राप्त अर्जांची सद्यस्थिती उपलब्ध करुन देणे.
- रूग्ण व नातेवाईकांच्या समस्यांचे निराकरण करणे.
- आर्थिक मदत झालेल्या रुग्णांची रुग्णालयात जाऊन भेट घेणे.
- नागरिकांमध्ये कक्षा बाबत जनजागृती आणि प्रसिध्दी करणे.
- कक्षामार्फत अर्थसहाय्य देण्याकरिता आजारांचे पुनर्विलोकन करणे.
- जिल्ह्यातील आपत्तीच्या ठिकाणी भेटी देणे.
- मुख्यमंत्री सहाय्यता निधीला अधिकाधिक देणग्यांचा ओघ येण्याकरिता प्रयत्न करणे.
- अर्थसहाय्य देण्यात येणाऱ्या आजारांच्या संख्येत वाढ करण्यासाठी प्रयत्न करणे.

**रूग्ण व नातेवाईकांना होणार कक्षाचे फायदे:**- रूग्ण व नातेवाईकांना मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाला अर्ज करण्याकरिता मदत मिळणार.

- अर्जासाठी आवश्यक कागदपत्रांची यादी, माहिती सहज उपलब्ध होणार.
- संलग्न असणाऱ्या रूग्णालयांची यादी मिळणार.
- अर्ज किंवा पाठपुरावा करण्यासाठी मंत्रालयात जाण्याची गरज भासणार नाही.
- अर्जाची स्थिती जिल्हाधिकारी कार्यालयात समजणार

अधिक माहितीसाठी आपण https://cmrf.maharashtra.gov.in/ या संकेतस्थळाला भेट देवू शकता.

ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयाच्या तळमजल्यावर सुरु करण्यात आलेल्या मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाचे उद्घाटन आज 1 मे 2025 रोजी जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे, अपर जिल्हाधिकारी हरिश्चंद्र पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.संदिप माने, प्र. उपजिल्हाधिकारी (सर्वसाधारण) सचिन चौधर, तहसिलदार (महसूल) रेवण लेंभे, तहसिलदार उमेश पाटील, प्रदीप कुडाळ, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) प्रमोद काळे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.गंगाधर परगे व मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाचे अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

**लेखक**
**- मनोज सुमन शिवाजी सानप**
**जिल्हा माहिती अधिकारी,ठाणे**

## पशुसंवर्धन विभाग अंतर्गत
## विविध वैयक्तिक लाभाच्या योजनांसाठी अर्ज करण्याचे आवाहन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड :** पशुसंवर्धन पंचायत समिती मुरबाड यांचे कडून आवाहन करण्यात येत आहे की शासनाच्या नाविण्यपूर्ण राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय योजना अंतर्गत दुधाळ गायी/म्हशीचे वाटप करणे , शेळी -मेंढी गट वाटप करणे , 1000 मांसल कुकूट पक्षांच्या संगोपनासाठी निवाराशेड उभारणीस अर्थसहाय्य पुरविणे, 100 कुकूट पिलांचे वाटप या योजनांसाठी आनलाईन पद्धतीने लाभार्थी निवड प्रकिया सन 2025-26 या वर्षात राबविली जाणार आहे.

तालुक्यातील पशुपालक/ शेतकरी,सुशिक्षित बेरोजगार युवक,युवती व महिलांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन पशुसंवर्धन विभागाकडून करण्यात येत आहे. अर्ज भरण्याचा कालावधी 02/5/2025 ते 01/06/2025 निश्चित करण्यात आला आहे.अधिक माहिती साठी नजिकच्या पशुवैद्यकिय दवाखाना किंवा पशुसंवर्धन विभाग पंचायत समिती मुरबाड यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन पशुसंवर्धन विभाग मुरबाड यांच्या वतीने करण्यात येत आहे.

## शिक्षक संघाच्या महिला प्रदेशाध्यक्षपदी रेखाताई सुडे

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



**पेण :** राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक संघ हा श्रमिक संघाकडे नोंदणीकृत असून या संघाचे संस्थापक अध्यक्ष माजी शिक्षक आमदार बाळाराम पाटील साहेब, मार्गदर्शक महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय आयोगाचे माजी सदस्य बी.एल. सगर किल्लारीकर साहेब, संघटनेचे प्रदेशाध्यक्ष अनिल नाचपले, सरचिटणीस संतोष भोजने, उपाध्यक्ष सुखदेव भालेकर, कार्याध्यक्ष बबनराव चव्हाण, प्रसिद्ध प्रमुख सचिन गडपतवार, राज्य कोषाध्यक्ष संजय भोईर या सर्वांच्या एकमतांनी महाराष्ट्र राज्याच्या महिला आघाडीची स्थापना करण्यात आली.. यामध्ये लातूर येथील बाभळगाव जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका रेखाताई सुडे यांची महिला राज्याध्यक्ष पदी निवड जाहीर करणेत आली. ओबीसी चळवळीतील योगदान, सामाजिक व शैक्षणिक कार्य, समाजाप्रती असलेली सदभावना, संघटन कौशल्य, आजपर्यंतच्या कालावधीमध्ये केलेले विविध उपक्रम आणि मिळवलेले पुरस्कार या सर्वांचा विचार करून संघटनेने त्यांच्याकडे महिला प्रदेशाध्यक्षपदाची महत्वपूर्ण जबाबदारी सोपवली आहे.

राज्यातील बहुजन, अनुसूचित जाती, जमाती, इतर मागासवर्गीय तथा तत्सम सर्व प्रवर्गातील महिला शिक्षिकांना योग्य तो न्याय मिळवून देण्यासाठी आपण कटिबद्ध आहोत असे रेखाताई सुडे आपल्या निवडीनंतर म्हणाल्या. राज्यभरातील महिला शिक्षिका यांच्या वतीने रेखाताई सुडे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे..

## राष्ट्रवादीने स्वागतासाठी लावलेली कमान भर रस्त्यात कोसळली



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून काढण्यात आलेल्या महाराष्ट्र गौरव रथ कलश यात्रा कल्याणमध्ये दाखल झाली होती. या यात्रेच्या स्वागतासाठी दुर्गाडी चौकात भव्य कमान लावण्यात आली होती. या कमानावर यात्रेच्या स्वागत आणि राष्ट्रवादीच्या नेत्याचे फोटो लावले होती. ही कमान आज कोसळून रस्त्यात पडली. त्याचा त्रास वाहन चालकांसह पादचाऱ्यांना सहन करावा लागला. ही घटना घडून चार ते पाच तास उलटून गेले तरी रस्त्यात पडलेली कमान हटविण्यात आलेली नव्हती. बऱ्याच वेळेनंतर ही कमान हटविण्यात आली. मात्र या घटनेमुळे शहरात अशा प्रकारे रस्त्यात कमानी लावून नागरिकांना अडथळा ठरणाऱ्या कमानींबाबत कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

## मुख्याध्यापकाने शिक्षकाकडून घेतली लाच

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी :** भिवंडी येथिल शाळेतील शिक्षकांच्या दुय्यम सेवा पुस्तिकेमध्ये वेतन आयोगाने सुचवलेल्या नोंदी करण्यासाठी साठ हजार रुपयांची लाच स्वीकारणाऱ्या शिक्षक आणि मुख्याध्यापक यांना ठाण्याच्या लाचलूचपत प्रतिबंधक विभागाच्या पोलिसांनी रंगेहाथ अटक केल्याने शिक्षक वर्गात खळबळ उडाली आहे. शहाजान मोहम्मदअली मौलाना, (54) असे शिक्षकाचे नाव आहे तर मुख्याध्यापकाचे नाव जियाउर रहमान मजहरुल्हक अन्सारी (52) असे आहे. हे दोघेही रईस हायस्कूल आणि जुनिअर कॉलेज येथे कार्यरत आहेत. या शाळेतील तक्रारदार शिक्षक शहाजान मोहम्मदअली मौलाना यांचे डुप्लीकेट सर्व्हिस बुक तयार करुन घेऊन व त्यावर वेतन आयोगानुसार नोंदी व शिक्के घेऊन देण्याकरीता शिक्षक शहाजान मोहम्मदअली मौलाना आणि मुख्याध्यापक जियाउर रहमान मजहरुल्हक अन्सारी हे तक्रारदार यांचेकडे ५० हजार रुपये लाचेची मागणी करीत असल्याबाबत तक्रारदार शिक्षकांनी ठाण्याच्या लाचलूचपत प्रतिबंधक विभागाकडे 19 मार्च 25 रोजी लेखी तक्रार दिलेली आहे.

त्याप्रमाणे काल 1मे रोजी करण्यात आलेल्या कारवाईत शहाजान मोहम्मदअली मौलाना यांना तक्रारदार यांचेकडून 60 हजार रूपये लाचेची रक्कम स्विकारतांना रंगेहाथ पकडण्यात आले असून मुख्याध्यापक जियाउर रहमान मजहरुल्हक अन्सारी, यांनाही ताब्यात घेण्यात आले आहे. वर नमूद दोन्ही लोकसेवक यांचेविरुध्द गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरू आहे.

## दक्ष पोलीसांचा मनसेतर्फे सन्मान

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



**उल्हासनगर :** विविध जाती-धर्मांचे सण-वार, सार्वजनिक उत्सव,विविध पक्षांची आंदोलने, मोर्चे यासर्वांमध्ये कायदा आणि सुव्यवस्था टिकवून प्रयत्नांची पराकाष्ठा करणाऱ्या, सणा सुदिंच्या दिवसांमध्येही स्वतःच्या कुटुंबाला वेळ न देऊ शकणाऱ्या आणि जनसामान्यांसाठी सदैव तत्पर असणाऱ्या उल्हासनगर पोलीस ठाण्यातील पोलीस अधिकारी आणि कर्मचारी यांचा महाराष्ट्र दिन आणि कामगार दिनाचे औचित्य साधून मनसे च्या वतीने सन्मान केला गेला.

अशा कर्तव्यदक्ष पोलिस अधिकारी कर्मचारी यांना फेटा बांधून, पुष्पगुच्छ देऊन महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने सत्कार करण्यात आला.

तसेच उल्हासनगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विष्णू नाथा ताम्हाणे यांना पोलीस महानीदेशक यांच्याकडून गौरविवेले ताम्हाणे यांना सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आल्याबद्दल त्यांचा विशेष सत्कार देखील करण्यात आला.यावेळी मनसेचे मैनुद्दीन शेख, वाहतूक सेनेचे शहर संघटक काळु थोरात, उप-शहर अध्यक्ष शैलेश पांडव, मुस्लिम संघटनेचे मुन्ना भाई, शाबीर शेख, मनसेचे विभाग अध्यक्ष कैलास घोरपडे, कैलाश वाघ,उप-विभाग अध्यक्ष मुकेश चव्हाण, शाखा अध्यक्ष संजय नार्वेकर ,दीपेश धारिवाल, तुकाराम थोरात, मनोज चिंचनकर, नरेश चिकसे,जगदीश माने,रोहित सिंग,संतोष शर्मा,साहिल सय्यद आणि महाराष्ट्र सैनिक उपस्थित होते.

## पोलिस निरीक्षक संदीप बागुल यांना महासंचालक बोधचिन्ह पुरस्कार

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



**पेण :** पोलिस दलात कार्यरत असताना पोलिस अधिकारी आणि कर्मचारी यांनी केलेल्या विशेष कामगिरीची दखल घेवून पोलीस महासंचालक बोधचिन्ह पुरस्काराने दरवर्षी सन्मानित करण्यात येते. यंदाचा हा मानाच्या पुरस्कार पेण पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक संदीप बागुल यांना आज १ मे महाराष्ट्र दिनी राज्याच्या महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांच्या हस्ते रायगड जिल्हा पोलीस मुख्यालयाच्या मैदानावर झालेल्या विशेष कार्यक्रमात प्रदान करण्यात आला.

पोलिस निरीक्षक संदीप बागुल यांनी यापूर्वी ठाणे येथील गुन्हे शाखेत काम करत असताना अनेक यशस्वी तपास केले आहेत. पेण पोलिस ठाण्याचा पदभार घेतल्यानंतर त्यांनी अवघ्या काही महिन्यांमध्ये अनेक गुन्हे हाताळून त्या घटनांचा यशस्वी छडा लावला आहे.अनेक गुन्हे काही तासांच्या आत उघड केले, तर आत्महत्या करणाऱ्या व्यक्तींना वाचवून संसार उध्वस्त होण्यापासून देखील त्यांनी वाचवले आहेत. त्यांच्या पेणमधील कामगिरीमुळे अनेक ठिकाणी गुन्-हेगारीला आळा बसला आहे. त्यांचे पेण तालुक्यातून विविध स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.

### बॉलीवूड स्टाईल बक्षीस वितरण सोहळ्यात
## सार्थक अगीवाले 'स्टार ऑफ द स्कूल'चा मानकरी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड. :** मुरबाड तालुक्यातील ग्रामीण भागातील जिल्हा परिषद केंद्रशाळा तळेगाव, येथे नुकताच पार पडलेल्या दिमाखदार, बॉलीवूड स्टाईल बक्षीस वितरण समारंभात. सार्थक अगीवले हा स्टार ऑफ द झेडपी स्कूल तळेगाव २०२४/२५ चा अंतिम विजेता ठरला.

त्याला सायकल, ट्रॉफी व प्रशस्तीपत्र देऊन मान्यवरांचे हस्ते त्याचा गौरव करण्यात आला. या कार्यक्रमाला पंचायत समिती माजी सदस्य अनिल घरत, पंचायत समिती माजी उपसभापती सीमा घरत , सरपंच राजेंद्र शिंगवा, उपसरपंचसविता हिलम , अध्यक्ष शाळा व्यवस्थापन समिती बापू देशमुख, मुख्याध्यापक धनाजी देशमुख , हरिचंद्र आढारी , सहशिक्षिका योगिता कडूस, सुरेखा नारखेडे, किरण पवार, श्रीकांत फलके , सुरज घुडे , रविकांत दावभट , माजी उपसरपंच शक्ती देशमुख हे मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक धनाजी देशमुख यांनी केले. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हे उद्दिष्ट डोळयासमोर ठेऊन शाळेत शैक्षणिक वर्ष २०२५/२५ मध्ये स्टार ऑफ द स्कूल उपक्रम राबविण्यात आला होता. या उपक्रमात वर्षभरात घेण्यात येणाऱ्या सर्व स्पर्धाचे वार्षिक नियोजन करण्यात आले होते. दर आठवड्याला किमान एक स्पर्धा घेण्यात आली.



स्पर्धेत सहभागासाठी १ star, प्रथम क्रमांक साठी ५ स्टार , द्वितीय क्रमांक साठी ४ स्टार तृतीय क्रमांक साठी ३ स्टार प्रदान करण्यात आले. तसेच दैनंदिन निरीक्षण, स्वच्छता, आरोग्य, शिस्त, दैनिक उपस्थिती या साठीही स्टार देण्यात आले. तसेच विविध परीक्षेत मिळालेल्या गुणानुसार स्टार प्रदान करण्यात आले.

क्रिया देशमुख हिला द्वितीय क्रमांकासाठी स्मार्ट टॅब, रुपाली देशमुख व श्रेया वाख हिला तृतीय क्रमांकासाठी स्मार्ट वॉच, यथार्थ देशमुख याला चौथ्या क्रमांकासाठी क्रिकेट संचव नम्रता ठाकरे हिला पाचव्या क्रमांकासाठी बॅडमिंटन संच व प्रत्येक विजेत्याला आकर्षक चषक व प्रशस्थीपत्र देण्यात आले.




## मुरबाड तालुक्यात शिंदे गटात होणार गटबाजी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड :** नुकताच मुरबाड तालुक्यातील अनेक पदाधिकारी कार्यकर्ते ऊबाठा पक्ष सोडून शिंदे गटात सामिळ झाले असले तरी शिंदे गटात सर्वात आगोदर ज्या कार्यकर्त्यांनी व पदाधिकार्यांनी प्रवेश केला आहे त्यातील अनेक जण ऊबाठा पक्षात असताना पक्षाचे काम कमी तर गटबाजी व कुरघोड्या करण्यात पटाईत होते. त्यामुळे अशा बिनबुडाच्या पदाधिकाऱ्यांनी ऊबाठा पक्ष सोडून शिंदेंच्या गटात प्रवेश केला तरी तिथेही ते निष्ठेची विष्ठा केल्या शिवाय रहाणार नाहीत नसल्याचे परखड मत जेष्टशिवसैनक सतिश घरत यांनी व्याक्त करीत शिवसैना कधीही संपणार नाही तर जे सोडून गेले त्यांचे राजकारण संपल्याची अनेक उदाहरणे आहेत




विशेष म्हणजे जे उबाठा ला सोडून गेले आहेत त्यांनी येथे देखील गटबाजीचे राजकारण करून स्वताचा स्वार्थ्यापोटी शिंदे च्या तंबूत घुसले असले तरी तालुक्यातील शि़दे गटात अशी परिस्थिती निर्माण होईल की 'भीक नको पण कुत्रा आवर,,,,,

> **शेकडो निष्ठावंतीची फौंज उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसैना सोबत ठाम**
> **- जेष्ठ शिवसैनिक सतिष घरत**

वैशिष्ट्य म्हणजे आजही मुरबाड तालुक्यात धर्मवीर आनंद दिघे व शिवभक्त साबीभाई शेख यांच्या तालमीत तयार झालेले हजारेंच्या संख्येने निष्ठावंत शिवसैनिक उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात खंबीरपणे पक्षाचे काम करीत आहेत, तर शिंदे गटात गेलेल्या कार्यकर्त्यांचा थोड्याच कालावधीत भ्रमनिरास होईल यात तिळमात्र शंका नाही, शेवटी त्यांची परिस्थीती अशी होईल की ग्रामीण भागात एक म्हण आहे ती अशी की "आया बायांनी दिली भर आणी ऊठगं म्हातारे नवरा कर " तसही या तालुक्यातील निष्ठावंत शिवसैनिक बाजारू पुढा-यांच नेतृत्व स्वीकारीत नव्हतेच किंवा या सोबत कधीही दिसून येत नव्हते, त्या मुळे मुरबाड तालुक्यातील उबाठाचा सातबारा कोरा झाला नाही तर ईतरहक्कावर ज्या बोगस नोंदी झाल्या होत्या त्या कायमच्या पुसल्या जाऊन उशिरा का हौंऊन हा सातबारा मुळ मालकाच्या ताब्यात राहिल्याचे लवकरच हजारोच्या संख्येने मेळावा भरवून दाखवून दिल जाईल हि तमाम निष्टावंत शिवसैनिकांची भावना सतिश घरत यांनी व्याक्त केली.





# गुलाबी कातकरी वाडी येथे समाजोपयोगी उपक्रम

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : मुरबाड तालुक्यातील विविध नावीन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात यशस्वी झालेल्या गुलाबी कातकरी वाडीत महावीर इंटरनॅशनल पवई यांच्या वतीने आयोजित कार्यक्रमात २० विद्यार्थ्यांसाठी सायकली वाटप करण्यात आल्या तसेच वाडीतील सर्व महिलांना दर्जेदार चप्पला,ताटे, तसेच शाळकरी मुलांना टि शर्ट, दफ्तर खाऊ या वस्तू भेट देण्यात आल्या. यावेळी संस्थेचे संस्थापक रणजित सिंग कुमट, अध्यक्ष अमित जैन,उपाध्यक्ष राजू शर्मा, सचिव विनोद कुमट, खजिनदार सुनील चौधरी, सदस्य अजित जैन,मोनिका जैन, इशाका जैन, सरिता जैन यांनी मेहनत घेतली. शांताई निसर्ग पर्यटन केंद्र शेलारी म्हाडस येथे कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. श्री गणेश मित्र मंडळ व गुलाबी वाडी यांचे सहकार्य लाभले.

# उष्णतेच्या लाटेपासून नागरिकांचे संरक्षण करा

## राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाचे निर्देश

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

नवी दिल्ली : यंदाच्या उन्हाळयात उष्णतेच्या लाटेचा धोका लक्षात घेता, राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने (NHRC) महाराष्ट्रासह 11 राज्यांना आर्थिकदृष्ट्या दुर्बळ, बेघर, वृद्ध, लहान मुले आणि उघड्यावर काम करणाऱ्या कामगारांच्या जीविताचे रक्षण करण्यासाठी तातडीने प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याचे निर्देश दिले आहेत. वर्षे 2018 ते 2022 या कालावधीत कडक ऊन आणि उष्माघातामुळे देशभरात 3,798 मृत्यू झाल्याचे राष्ट्रीय गुन्हे रेकॉर्ड ब्युरो (NCRB) च्या आकडेवारीतून समोर आले आहे. या पार्श्वभूमीवर, NHRC ने निवारा, पिण्याचे पाणी, वैद्यकीय सुविधा आणि कामाच्या वेळांमध्ये बदल यासारख्या उपाययोजनांवर भर देण्याच्या सूचना आयोगाने केल्या आहेत.

राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने महाराष्ट्र, पंजाब, हरियाणा, उत्तर प्रदेश, बिहार, झारखंड, पश्चिम बंगाल, ओडिशा, आंध्र प्रदेश, तेलंगणा आणि राजस्थान या राज्यांच्या मुख्य सचिवांना पत्र लिहून उष्णतेच्या लाटेचा सामना करण्यासाठी ठोस पावले उचलण्यास सांगितले आहे. आयोगाने राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या (NDMA) मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करत उष्म्याशी संबंधित आजारांवर उपचार, सार्वजनिक ठिकाणी पंखे, पिण्याचे पाणी, ORS आणि सावलीची व्यवस्था, तसेच कामगारांसाठी संरक्षक कपडे आणि विश्रांतीच्या सुविधा उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले आहेत. विशेषत: अनौपचारिक वसाहती आणि कामगार वस्त्यांमधील कुटुंबांना पंखे, थंड छताचे साहित्य आणि ORS ची पाकिटे देण्यावर भर देण्यात आला आहे.

आयोगाने राज्यांना विद्यमान मानक कार्यप्रणाली (SOPs) आणि NDMA मार्गदर्शक तत्त्वांनुसार उष्णतेच्या लाटेचा धोका असलेल्या लोकांचे संरक्षण करण्यासाठी केलेल्या उपाययोजनांचा अहवाल सादर करण्यास सांगितले आहे. यामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बळ, बेघर आणि उघड्यावर काम करणाऱ्या व्यक्तींवर उष्णतेचा होणारा परिणाम कमी होण्याची अपेक्षा आहे.

# आदिवासी समाजाची संस्कृती जिवंत ठेवण्यासाठी आम्ही कटिबद्ध

## – आदिवासी विकास मंत्री डॉ.अशोक उईके

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : आदिवासी समाज देव, देश, धर्मावर विश्वास ठेवून कार्य करणारा समाज आहे. आदिवासी समाजाची आदर्श व लोकप्रिय संस्कृती जिवंत राहिली पाहिजे, यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत, असे प्रतिपादन आदिवासी विकास मंत्री डॉ.अशोक उईके यांनी आज येथे केले.

आदिवासी स्वातंत्र्यवीर राघोजी भांगरे यांच्या 177 व्या स्मृतीदिनानिमित्त ठाणे येथील कारागृहामध्ये आयोजित विशेष कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी आमदार संजय केळकर, आमदार निरंजन डावखरे, हंसराज खेवरा, सुनिल भांगरे, अनिल भांगरे, विठ्ठल भांगरे, लकी जाधव, भूपाळा मामा, गोविंद साबळे, डॉ.सुपे, रामनाथ भोजने, राजेंद्र भांगरे, विश्वनाथ किरकिरे, बळवंत गावित, दिलीप परेकर, योगेश नम आदी उपस्थित होते.

डॉ.उईके पुढे म्हणाले की, आदिवासी समाजाचे क्रांतीवीर, क्रांतीकारक, स्वातंत्र्यवीर राघोजी भांगरे यांच्या 177 व्या स्मृतीदिनानिमित्त सर्वदूर महाराष्ट्रात समस्त आदिवासी बांधवांच्या, लोकप्रतिनिधींच्या माध्यमातून आदिवासी समाजाप्रती राघोजी भांगरे यांनी केलेले कार्य पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात येत आहेत.



आदिवासी समाजाला जल, जमीन, जंगलची मुक्ती मिळाली पाहिजे. आदिवासी समाजाचा विकास व्हायला हवा, तो मुख्य प्रवाहामध्ये यायला हवा. हा संकल्प घेवून केलेल्या क्रांतीमध्ये आज आम्ही सर्व समाजाच्या वतीने या ठिकाणी अभिवादन केले.

ते पुढे म्हणाले, अनेक वर्षापासून या ठिकाणी असलेली क्रांतीवीर, स्वातंत्र्यवीर राघोजी भांगरे यांची स्फूर्ती जपण्यासाठी आम्ही भव्य मशाल यात्रा काढू. या मशाल यात्रेच्या माध्यमातून आदिवासी समाजाच्या स्फूर्ती जिवंत ठेवण्याचा संकल्प घेवून सातत्याने नियमित कार्य सुरू आहे. आदिवासी विभागाच्या माध्यमातून देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या कल्पनेतून व आदिवासी विभागाच्या माध्यमातून आदिवासी समाजासाठी केलेली क्रांती, त्यांच्या स्फूर्ती जपण्यासाठी जी जी स्थळे आहेत, त्या स्थळांचा स्थळ विकास महाराष्ट्रामध्ये येणाऱ्या काळामध्ये केला जाणार आहे. त्यांच्या स्फूर्ती जिवंत राहिल्या पाहिजेत, अशा प्रकारचा संकल्पच शासनाने केला आहे. भगवान बिरसा मुंडांच्या जनजाती गौरव दिनाचे औचित्य साधून संपूर्ण महाराष्ट्रामध्ये आदिवासी समाजातील क्रांतीवीरांच्या स्फूर्ती जपण्यासाठी विविध उपक्रम राबविले जातील, असे सांगून डॉ.उईके पुढे म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित दादांना विनंती करणार आहे. येणाऱ्या काळामध्ये आदिवासी समाज आणि त्यांच्या स्फूर्ती जपण्यासाठी, आदिवासी समाजाकरिता ज्या महापुरुषांनी, क्रांतीवीरांनी, राघोजी भांगरे यांनी 1930 साली जे केलेले कार्य आहे, क्रांती आहे त्या कार्याची महती सर्वांना माहीत व्हावे आणि क्रांतीवीर भांगरे यांना ठाण्यातील या कारागृहामध्ये बंदिस्त केले होते, या ठिकाणी राघोजी भांग्रे यांच्या स्फूर्ती जिवंत राहण्यासाठी या कारागृहाला त्यांचे नाव देण्यासाठी मी पुढाकार घेवून शासनाकडे विनंती करीन. या ठिकाणी राघोजी भांगरे यांचा इतिहास आदिवासी विभागाच्या पुढाकारातून विविध योजनांच्या माध्यमातून तो समाजापर्यंत पोहोचावयास हवा,अशी एखादी योजना निश्चित सुरू करू. त्या योजनेला राघोजी भांग्रे नाव देवून आम्ही शंभर टक्के प्रयत्न करू. या ठिकाणी आज त्यांना मनापासून भावपूर्ण अभिवादन आहे.



मा. श्री. गणेश नाईक साहेब ( मा. वनमंत्री, कॅबिनेट मंत्री, महाराष्ट्र राज्य) यांची प. पू. स. अलोकनाथजी महाराज यांच्या प्रगट दिनाच्या शुभेच्छा देण्याकरिता स्नेह भेट.




मा. जिल्हास्तरीय वन हक्क समितीने ठाणे तालुक्यातील मंजूर केलेल्या एकूण 265 वैयक्तिक वनपट्ट्यांपैकी 108 मंजूर वैयक्तिक वनपट्टे/टायटल्स डीड्सची लॅमिनेशन केलेली मूळ प्रत संबंधित धारकांना दिनांक 2.05.2025 रोजी वाटप करण्यात आली. सदरचे मंजूर वैयक्तिक वनपट्टे मिळाल्यानंतर संबंधित सर्व आदिवासी बांधवांच्या व भगिनींच्या चेहऱ्यावर समाधानाचे भाव दिसून आले.

# ‘एआय’ आणि मनोरंजन क्षेत्रात भारताला नेतृत्वाची संधी

## – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : जागतिक स्तरावर मनोरंजनक्षेत्रात ‘एआय’चा वापर मोठ्या प्रमाणात होत आहे. येत्या काळात नवी मुंबई येथे ‘एआय’ तंत्रज्ञानची शिक्षणनगरी उभारण्यात येणार आहे. त्यामुळे आता ‘एआय’ आणि मनोरंजन क्षेत्राचे जागतिक नेतृत्व करण्याची संधी भारताला मिळणार असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. वेव्हज परिषदेदरम्यान महाराष्ट्र पॅव्हेलियन येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माध्यम प्रतिनिधींशी संवाद साधला. त्यावेळी ते बोलत होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, वेव्हज परिषदेसारख्या एका व्यासपीठाची जागतिक पातळीवर गरज होती. ही गरज ओळखून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी पहिल्या वेव्हज परिषदेचे आयोजन केले आणि त्याचे यजमानपद महाराष्ट्राकडे दिले राज्यासाठी ही एक मोठी संधी आहे.

वेव्हज परिषदेच्या निमित्ताने महाराष्ट्र सरकारने काही अत्यंत महत्त्वाचे सामंजस्य करार (MoUs) केलेले आहेत. यामध्ये सगळ्यात महत्त्वाचा, एनएसईने (NSE) वेव्हज निर्देशांक सुरू केलेला आहे. ४३ कंपन्या, या दृकश्राव्य क्षेत्रातल्या आहेत, या कंपन्यांचा निर्देशांक सुरू झालेला आहे. त्यामुळे या क्षेत्रामध्ये गुंतवणूक करत आणि एकूणच फायनान्शियल इकोसिस्टीम तयार करण्याकरिता हे अत्यंत महत्त्वपूर्ण पाऊल उचललेले आहे. हा वेव्हज इंडेक्स म्हणजे वेव्हजच्या यशामधला एक मुकुटमणी असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. ऑस्ट्रेलिया आणि न्यूयॉर्क या दोन जागतिक विद्यापीठांसोबत आज सामंजस्य करार केल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, नवीन शैक्षणिक धोरणाच्या अंतर्गत, परदेशी विद्यापीठांना देशामध्ये त्यांचे केंद्र उघडण्याची परवानगी मिळाली असून नवी मुंबई इथे सिडकोच्या पुढाकाराने एज्युसिटी उभारण्यात येणार आहे. या एज्युसिटीमध्ये जागतिक दर्जाची 10 ते 12 विद्यापीठे आपले कॅम्पस सुरू करणार आहेत. त्यातील दोन विद्यापीठांशी सामंजस्य करार करण्यात आला. सुरुवातीला दीड हजार कोटींची गुंतवणूक होणार आहे. पण भविष्यात ही गुंतवणूक वाढत जाणार आहे. आणखी तीन महत्त्वाच्या विद्यापीठांशी चर्चा सुरू आहे. देशातले जागतिक विद्यापीठ एकत्र असलेले पहिले कॅम्पस नवी मुंबईमध्ये सुरू होत आहे.

यासोबत प्राइम फोकससोबत (Prime Focus) सामंजस्य करार करण्यात आला आहे, ज्याच्यामध्ये प्राइम फोकस एक फिल्मसिटी या ठिकाणी तयार करणार आहे, ज्यामध्ये जवळपास 3 हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करणार असून किमान 10 हजार लोकांना रोजगार मिळेल. ‘एआय’ (AI) पॉवर आणि जगातली उत्तम तंत्रज्ञानही त्या ठिकाणी असणार आहे.

पनवेल येथे चित्रपट सृष्टी उभारण्यासाठी गोदरेज सोबतही दोन हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीबाबत सामंजस्य करार करण्यात आला आहे. एकूण 8000 कोटी रुपयांचे सामंजस्य करार करण्यात आले असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. फिल्मसिटी म्हणजे तंत्रज्ञान - फिल्मसिटी म्हणजे लोकेशन नाही, आता फिल्मसिटी म्हणजे टेक्नॉलॉजी असल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, सर्व तंत्रज्ञानाने परिपूर्ण चित्रपट सृष्टी असेल. तेथे चित्रपट निर्मिती क्षेत्रातील सगळ्या गोष्टींसाठी परिसंस्था असतील. आतापर्यंत आपले लोक तिथे वेस्टर्न ऑस्ट्रेलियाच्या विद्यापीठामध्ये प्रवेश घेण्याकरिता प्रयत्न करायचे, मात्र जे लोकं जाऊ शकत नाहीत, त्यांना तेच शिक्षण या ठिकाणी मिळणार आहे. आज वेगाने विकसित होणारी अर्थव्यवस्था जर कुठली असेल, तर ती दृकश्राव्य माध्यमाची अर्थव्यवस्था आहे. सर्वात जास्त रोजगाराची संधी यात असून, या क्षेत्रात भारताला नेतृत्व करण्याची संधी आहे. कारण कंटेंट क्रिएटर्स, कंटेंट वापर, आपल्याकडे सगळ्यात जास्त आहेत. या क्षेत्रात नेतृत्व करणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे. वेव्हजमुळे, हे शक्य झाले आहे आणि मुंबई, ही दृकश्राव्य माध्यमाची जणू राजधानीच या संमेलनामुळे झालेली असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

# वाढत्या उष्णतेमुळे वन्यप्राण्यांचा पाण्यासाठी नागरी वस्तीत शिरकाव

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : सध्या सूर्य आग ओकत असल्यामुळे उन्हाळ्याची झळ सर्वांनाच जाणवत आहे. गेल्या काही दिवसांपासून तापमानात वाढ होत असून याचा मानवी जीवनासह पक्षी आणि प्राण्यांवर देखील परिणाम होत आहे. मुंबईकर वाढत्या उष्णतेमुळे त्रस्त झाले असून दुपारी घरा बाहेर पडल्यास अंगातून घामाच्या धारा वाहतात व जीवाची लाही लाही होते. माणसे उष्माघातापासून बचाव करण्यासाठी शासनाने सांगितलेल्या नियमाचे पालन करून स्वतःची काळजी घेताना दिसत आहेत. परिणामी उपचार सुद्धा घेत आहेत. परंतु मुकी जनावरे, पक्षी स्वतःला त्रास होत असताना सुद्धा आपल्या वेदना इतरांना सांगू शकत नाहीत. वाढत्या उष्णतेचा पक्षांना फटका बसू लागला आहे. वाढत्या उन्हामुळे पक्षांच्या शरीरातील पाणी कमी होऊन ते झाडावरून किंवा उडताना अचानक खाली पडून जखमी होत आहेत. अंगाला चटके लागून जीव कासावीस होतोय ही माणसांची अवस्था तर वन्यजीव प्राण्यांची काय स्थिती असेल याचा आपण विचारच करू शकतो.





सावरकर नगर परिसरात अनेक वन्य प्राणी अस्वस्थ अवस्थेत असल्याचे दिसून आले. सावरकर नगर परिसराचे बाजूलाच येऊरचे जंगल असून या जंगलातील सांबर, हरीण, माकडे, वानर हे मनुष्य वस्ती जवळ पाण्याकरीता येऊ लागले आहेत. जंगलामध्ये असलेले पानवठे नाहीसे होत आहेत. या दिवसात जंगलाच्या आतील भागात असलेले नैसर्गिक पाणवठे हे पालापाचोळा, गाळ, माती यांनी बंद झालेले असतात. वन्यजीव आपली तहान भागविण्यासाठी नद्या, तलाव, नैसर्गिक झरे, किंवा पाऊस जमा होणारी ठिकाणे या नैसर्गिक जलस्त्रोतांवर अवलंबून असतात. तसेच वृक्षतोड झाल्यामुळे जंगल परिसरातील प्राणी मानवी वस्तीकडे धाव घेताना दिसत आहेत. जंगल भागातील माकडांनी मानवी वस्तीत प्रवेश केला आहे. गेल्या आठवड्यात उष्णतेचा पारा चढलाल्यामुळे पाण्याची चणचणदेखील भासू लागली आहे. जंगल आणि उंच भागांतील पाणीसाठा वाढत्या उन्हामुळे संपुष्टात आल्याने प्राण्यांवर पाण्यासाठी नागरी वस्तीकडे वळण्याची वेळ आली आहे. सावरकर नगर परिसरात मोठ्या प्रमाणात वानर वावरताना दिसून येत आहेत. पाण्याच्या शोधातच हे वानर जंगलाबाहेर पडले असल्याचा अंदाज प्राणीमित्रांनी व्यक्त केला आहे. पक्ष्यांना पाण्याची अधिक गरज असते, वेळीच पाणी मिळाले नाही तर उडता उडता त्यांच्या शरीरात अशक्तपणा निर्माण होऊन खाली पडून मृत्यू होतो. उन्हाळ्यामध्ये पक्ष्यांना पाणी कमी प्रमाणात मिळते. नैसर्गिक पाणीपुरवठा आटतो. डिहायड्रेशन झाल्यामुळे चक्कर येऊन पडून मृत्यू होतो.

## येऊर जंगलातील पाणवठे खुले करण्यासाठी स्वराज संस्था सरसावली

वाढत्या उष्णतेमुळे होणाऱ्या त्रासातून जशी आपण आपली काळजी घेतो तसेच पक्षी व प्राण्यांची काळजी घेऊन त्यांचा जीव वाचवणे हे आपले सामाजिक कर्तव्य आहे. स्वराज संस्थेते येऊर जंगलातील पाणवठे खुले करण्याचे काम हाती घेतले आहे. सावरकर नगर व लोकमान्य नगर येथील जंगल वस्तीच्या परिसरातील रहिवाशांनी आपण आपल्या घरासमोर, गॅलरीत, इमारतीवर पक्षी व प्राण्यांच्या पाण्याची व्यवस्था करावी.
- संजय देवकर,अध्यक्ष,स्वराज सामाजिक संस्था, ठाणे

काही प्राणी विशेषतः उन्हाळ्यात, पाण्याच्या शोधात लांब अंतरांपर्यंत प्रवास करतात आणि मानवी वस्त्यांजवळ पाणी शोधतात म्हणूनच जंगलातील बुजलेले पाणवठे खुले करण्यासाठी स्वराज्य सामाजिक संस्था ठाणे व जीवोहम ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच वनविभाग यांच्या सहकार्याने पहिला टप्पा "चिंबीचे पाणी" येथील नैसर्गिक पाणवठा माती दगड गोटे पालापाचोळा आदी काढून खुला करण्यात आला तसेच जंगलात काही ठिकाणी बुजत आलेले पाणवठे पावसाआधी खुले करण्याचा आमचा प्रयत्न आहे असे जीवोहम ट्रस्ट चे सर्वेसर्वा ज्ञानेश्वर शिरसाठ यांनी सांगितले. जेणेकरून जंगलातील वानर, माकड, भेकर, ससे, हरीण, सांबर, बिबटे व इतर पशु पक्षी यांची पाण्यासाठी ची वणवण थांबेल. स्वराज्य संस्थेचे संस्थापक अध्यक्ष संजय देवकर, परेश परब, विजय सावंत, प्रशांत सातपुते, प्राणीमित्र तसेच जीवोहम ट्रस्ट चे सदस्य ज्ञानेश्वर शिरसाट, समीर डिके, वीरेंद्र सावंत, रवी दिवा, तेजेन्द्र पोटे या सर्वांच्या सहकार्याने सदर उपक्रम यशस्वी करण्यात आला. शालेय परीक्षा संपून सुट्टी जाहीर झाल्याने सदरच्या उपक्रमात ३ बाल सदस्यही सहभागी झाले होते तसेच आर एफ ओ मयूर सुरवसे यांचे मोलाचे मार्गदर्शन मिळाले. वनविभागाचे इतर कर्मचारी यांची देखील साथ मिळाली




## आगरी समाज प्रबोधन संस्था, डोंबिवली तर्फे

# आगरी वधू वर सामुदायिक विवाह सोहळा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली : आगरी समाज प्रबोधन संस्थेतर्फे आगरी वधू वर सामुदायिक विवाह सोहळा 2025 मोठ्या आनंद उत्सवात पिंपळेश्वर महादेव मंदिर प्रांगणात संपन्न झाला.




गेल्या पाच-सहा वर्षांपासून ते ही संस्था समाजातील गोर गरिबांचे सामुदायिक विवाह सोहळे संपन्न करीत आहे यंदाचे पाचवे वर्ष असून याचे वैशिष्ट्य म्हणजे आगरी समाजातील धनाध्य लोक स्वतःहून लाखो रुपयाची देणगी या सामुदायिक विवाहाला देऊन हे विवाह यशस्वीरित्या पार पडतात यावर्षी 15 नव वधूवरांचा विवाह सोहळा संपन्न झाला. कर्ज काढू नका, जमीन गहाण टाकू नका, हळदी कार्यक्रमातील गैरप्रकार टाळा, चिंता करू नका. लग्न जमवण्यापासून नवरा नवरीला घरपोच पोहोचवण्यापर्यंत ची जबाबदारी ही संस्था घेते. आगरी समाज प्रबोधन संस्था हे सामुदायिक विवाह घडवून आणण्यासाठी त्यांचे अगणित कार्यकर्ते सात-आठ महिन्यापासून मोफत सेवा करीत असतात.

आगरी समाज प्रबोधन कार्यकारणी मध्ये एकूण 13 सदस्य आहेत तर आगरी समाज विवाह सोहळा समिती मध्ये शंभर सदस्य आहे यामध्ये कुणालाही कुठलेही पद नाही मोफत सेवा हेच कार्य आहे.

यामध्ये अनेक हितचिंतक प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष आगरी समाजाचे काम करीत असतात.असेच सामुदायिक आदर्श विवाह सोहळे इतरांनीही करावे असे आव्हान करण्यात येत आहे.




‘ठाणे जीवनदीप वार्ता’ हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024